Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1 – 2025

JOURNAL OF EAST-WEST THOUGHT

Impact Factor: 7.665, UGC CARE I

बुढाई कादंबरीतील भाषाशैली

वर्षा भानुदास चौके (रंदई), संशोधक विद्यार्थी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

डॉ. गणेश चव्हाण, संशोधन मार्गदर्शक, मराठी विभाग प्रमुख, संत गाडगे महाराज महाविद्यालय, हिंगणा, नागपूर

प्रास्ताविक

'बुढाई' ही डॉ. प्रतिमा इंगोले यांची साहित्यकृती आहे. वऱ्हाडी भाषा कादंबरीतून लेखिकेने वऱ्हाडी बोली भाषेचे वैभव वर्णन केले आहे. "बुढाई कादंबरीतील भाषाशैली" हा विषय या प्रस्तुत शोध निबंधातून मांडलेला आहे. प्रतिमा इंगोले यांच्या एकूणच साहित्य प्रकाराचे विवेचन करताना असे लक्षात येते की, त्यांच्या कथा, कादंबरी, कविता, नाट्याछटा, बालवाङ्मय ह्या सर्वच लेखनामध्ये मराठी भाषेमुळे वाचनीयता निर्माण होऊन वाचकांच्या मनाची पकड घेते. "उत्कंठा, हुरहुर आणि जिज्ञासा वाढविणारे कथानक फुलविण्यात लेखिका यशस्वी झाली आहे. पारंपारिक पद्धतीने तपशील मांडत तटस्थपणे निवेदन करून निवेदनाला पुरक भाषा आहे.1 त्यांनी या कादंबरीत निवेदनासाठी वऱ्हाडी भाषेचा वापर केल्यामुळे वातावरणनिर्मिती करणे त्यांना सहज शक्य झाले. ग्रामीण परिसरातील ग्रामीण बोलीचा वापर असलेल्या खुमासदार चित्रमय शैलीने प्रादेशिक वातावरण निर्मितीला मदत झाली आहे. भाषा ही दर बारा कोसावर बदलणारी असते असे म्हणतात. ग्रामीण साहित्यात परिवर्तने झाली ती 1980 नंतरच झाली. साहित्याकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला. नविन विचारांमुळे नवे प्रवाह निर्माण झाले. संवेदनशील मने अंतर्मुख होवून सृजनशील, संवेदनशील तरूण मने आपले जीवनानुभव शब्दांकित करू लागले. ग्रामीण खेडूताकडे कधी गांभीर्याने न पाहिल्याने ग्रामीण समाजाबद्दल तुच्छतेची भावना उच्चवर्णीयांची होती, त्यामुळे आपल्या समाजासाठी आपण लेखणी घ्यावी ही भावना निर्माण होवून संघर्ष सुरू झाला. त्यात आपली भाषा गावंढळ अशी आहे का? अशी खंत मनाला बोचत असलेले संवेदनशील लेखक आनंद यादव, शंकरराव खरात, चंद्रकुमार नलगे, बाबा पाटील, मधुमंगेश कर्णीक, रा.र. बोराडे इ. चे साहित्य ग्रामीण वास्तव चित्रित करू लागले. निवेदनासाठी बोलीचा वापर केला जाऊ लागला. हाच आदर्श घेत बाबाराव मुसळे, प्रतिमा इंगोले, रविंद्र शोभणे, सदानंद देशमुख, किशोर सानप, सुखदेव ढाकणे इ. लेखक आपल्या स्वजाणीवा स्वभाषेतून व्यक्त करू लागले.

साहित्य कलेशी निगडीत असलेली भाषा हे माध्यम मोठे वैशिष्ट्यापूर्ण आहे. या संदर्भात आनंद यादव म्हणतात, "त्या संस्कृतीचा भाषेला सततचा संदर्भ असतो, ज्या स्त्री पुरुषांच्या वापरात ती नेहमी असते, त्या सर्वांचे सत्व तिला लाभलेले असते. त्यावर तिचे प्राणपोषण होत असते. त्यातूनच तिला सर्व व्यक्तित्व प्राप्त

Copyright © | JET Network, All Rights Reserved

झालेले असते."2 ग्रामीण साहित्यिक आपआपल्या परिसरातील संस्कृती आणि तेथील भाषा आत्मसात करूनच साहित्यलेखन करतो. बोलीसुद्धा त्या त्या प्रदेशानुसार बदलते याचे प्रत्यंतर त्यांच्या साहित्यातून अभ्यास करता येते.

मुख्य संबोध: वऱ्हाडी भाषा, भाषा शैली, गिलावा, पोपडा, वाक्प्रचार, म्हणी, अलंकार.

भाषा म्हणजे काय?

भाषेमुळेच मानवास संस्कृती लाभली. परस्पर समंजस्य साधून तो सुसंस्कृत विकसित झाला. मानवाने भाषा निर्माण केली आणि भाषेने मानव निर्माण केला. या सर्व कारणांमुळे सामाजिक संस्थात भाषेसारखी व सर्वोपयोगी अशी दुसरी संस्था नाही.

व्याख्या -

Croce:

Language is articulated, limited, sound, organised for the purpose of expression.

श्री. न. गजेंद्रगडकर: "यादृच्छिक ध्वनी संकेतावर आधारलेली समता व्यवहाराला साह्यभूत अशी पद्धत म्हणजे भाषा."

कृ. पा. कुलकर्णी: "भाषा म्हणजे व्यवहारास प्रवृत्त करणाऱ्या सार्थ व अन्वित ध्वनींचा समूह."

मा. गो. काललेकर: "मूळ आशयाशी कार्यकारण संबंध नसलेल्या ध्वनीसंकेतांनी बनलेली समाज व्यवहाराला साह्यभूत अशी भाषा ही एक पद्धत आहे."

वरील सर्व भाषातज्ज्ञांच्या मतांवरून आपणांस असे म्हणता येईल की, भाषा म्हणजे परस्परसहकार्य आणि विनिमयासाठी मानवी मुखातून प्रकटलेली यादृच्छिक ध्वनिसंकेत पद्धती होय.

भाषा हे संवादाचे एक प्रभावी माध्यम आहे. बोलणारा आणि ऐकणारा यांना जोडणार पूल म्हणजे भाषा होय. आपले विचार, भावना, कल्पना, अर्थछटा नेमकेपणाने व्यक्त करण्यासाठी भाषेवरील प्रभुत्व आवश्यक असते. भाषा संवादाचे माध्यम आहे. भाषा म्हणजे विचार, भावना, अनुभव व कल्पना व्यक्त करण्याचे साधन असते."3 भाषा ही व्यवहार उपयोगी आहे. एका विशिष्ट वर्णमालेचा उपयोग करून निर्माण केलेल्या ध्वनिसंकेतांनी समाजाचे व्यवहार चालवणारी ती एक मौल्यवान भाषा ठरते. भाषा ही एक सांस्कृतिक व्यवस्थाही आहे. "समाजाची शिक्षण, धर्मकारण, राजकारण, समाजकारण, भूगोल, इतिहास, विज्ञान ही जी अंगे आहेत ती सारी त्या त्या समाजाच्या संस्कृतीची घटक अंगे असतात. या सर्व

Copyright © | JET Network, All Rights Reserved

अंगोपांगाविषयीचे ज्ञान भाषा जतन करीत असते.4 भाषा ही सामाजिक संस्थादेखील आहे. मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे. समाजात परस्पर सहयोग, सहकार्य यासाठी विनिमयाचे साधन म्हणून भाषेचे फार महत्त्व आहे. भाषा ही इतर सामाजिक संस्थाप्रमाणे ती समाजाच्या मालकीची असते. रूढीमान्य शब्द, सर्वमान्य संकेत असलेली भाषा वापरली तरच ती व्यवहार, परस्पर विनिमय शक्य होते.

प्रमाणभाषा व बोलीभाषा:

प्रमाणभाषा व बोलीभाषा पाहत असताना दोन तत्त्वे ध्यानात घ्यावी लागतात. ती तत्त्वे म्हणजे आकालन आणि विनिमय, एका दृष्टीने ही उभयताचे परस्परालंबीच असतात. कारण आकलनक्षमतेतूनच विनिमय शक्य होते. ह्यावरून आपणास शास्त्रदृष्ट्या दोन प्रकारे विचार करता येईल. एक सर्व प्रकारच्या रचनावैचित्र्याला शक्यतो सामावून घेणारी विधाने करणे. दुसरे म्हणजे काही प्रतिनिधीतून घटकांना अनुलक्षून सार्वत्रिक विधान करणे अशा प्रकारे विचार करता येईल.

कोणतीही जिवंत भाषा स्थिर व विकाररहित नसते. म्हणजेच विविधात्मक असते. समाजात व्यक्त होणारी संस्कृती बहुविध असते. त्यात बहुविध संस्कृतीतील मानवाच्या गरजा, त्यांच्या पूर्तीची साधने त्यांच्या अनुषंगाने भाषा ही बहुविध बनते. मराठीतील एक म्हण आहे बारा कोसावर भाषा बदलते. भाषा ही खरोखरच सतत बदलणारी गोष्ट आहे. ती कालपरत्वे, स्थानपरत्वे, प्रसंगपरत्वे आणि व्यक्तिपरत्वे बदलत असते. “आत्मप्रकटीकरणासाठी भाषा अस्तित्वात येत असते. तेव्हा ती जाणवलेल्या भावना विचारात रूप देण्यासाठी नवे नवे शब्द निर्माण करीत असते. ही प्रक्रिया नवनिर्मिती प्रक्रियेसारखी असते, कालांतराने समूहमनात तो शब्द रूढ होतो. समाज त्या शब्दांचा सर्रास उपयोग करू लागतो.” मानवाच्या मातृभाषेमुळेच तो आत्मप्रगटीकरण करत असतो. त्यासाठीच बोलीभाषेचा विचार करणे आवश्यक असते म्हणजे त्या त्या बोलीतून त्याला जे सूचतं ते प्रगट करीत असतो. लेखकांनी बोली भाषेतून जे शब्द घेतले ते कालांतराने समाजात रूढ होतात.

बोलीभाषा व प्रमाणभाषा ह्या एकमेकींना समांतर असतात पण बोली पूर्वीच तयार झालेली असते. आपण कुटुंबात सोयीसाठी कामांची वाटणी जशी करून देतो. कुटुंबप्रमुख तो काही वेगळा नसतो. हीच बाब लक्षात घेवून प्रमाणभाषा बोलीभाष एकत्र नांदते. आज प्रमाणभूत मराठीच्या सर्वच बोलीतून साहित्यनिर्मिती होतांना दिसते. त्यामुळे प्रादेशिक भाषा आणि लोकजीवन हा एकमेकांजवळ असल्यामुळे मराठी भाषा एकरूप होताना दिसते.

Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1 March 2025

Impact Factor: 7.665, UGC CARE I

वऱ्हाडी भाषेची परंपरा:

प्राचीन काळापासून मराठी साहित्य वैपुण्याने निर्माण झाले ते विदर्भात. त्यामुळे ह्या प्रदेशात संस्कृत व प्राचीन मराठी साहित्य हे वैपुण्याने निर्माण झाले आहे. मुरारी या कवीने त्यांच्या 'अनर्घराघवात' या ग्रंथात विदर्भ म्हणजे 'महाराष्ट्र' आहे असे वर्णन केले आहे. नंतर 'हेमचंद्र' या व्याकरणकाराने विदर्भातील भाषेला प्राकृत भाषा असा उल्लेख केला. प्राकृत भाषा संस्कृत समकालीन भाषा आहे. वात्सायन मुनीचे 'कामसुत्रे', सशोधराचे 'जयमंगल' महाकवी 'गुणाढयाचा पैशाची भाषेतील बृहत्कथा हेही प्राचीन विदर्भातीलच आहे. प्राचीन काळात विदर्भात अनेक लेखक, कवीने साहित्य निर्माण केले आहेत. राजशेखर, गोसावीनंदन, मोरेश्वर आणि मुक्तेश्वर असे अनेक कवी विदर्भात होऊन गेलेत. या सर्व लेखक कवीमुळे मराठीचा जन्म हा विदर्भात झाला तर बोलीभाषा म्हणून असलेले रूप हीच वऱ्हाडी भाषा होय. श्री वा. ना. देशपांडे यांचा 'वऱ्हाडी लोकभाषा' हा लेख वऱ्हाडी भाषेबद्दलची अनेकांची मते स्पष्ट करतो. या लेखात 'विल्सन फायलाॅलाजिकल लेक्चरर्स' या ग्रंथातील मराठीच्या पोटभाषा कोणकोणत्या आहेत हे सांगितले आहे. वऱ्हाडी भाषेत आलेले सुंदर वाक्प्रचार व म्हणी यांचा स्विकार होत आहे. मराठीत वऱ्हाडी भाषेला अतिशय प्राचीन अशी परंपरा लाभली आहे. वऱ्हाडी भाषेतील आद्य ग्रंथकारांनी मराठी भाषेला समृद्ध केलेले आहे. कारण प्रतिभासंपन्न वाङ्मयाने भाषा स्थिरावते. शिष्टमान्य होते. तिला वैश्विक स्वरूप प्राप्त होते. वऱ्हाडी भाषेला प्राप्त झालेले नागर स्वरूप म्हणजेच मराठी भाषा होय.

वऱ्हाडी ही एक लोकभाषा:

भाषा ही विनियमाचे साधन असल्याने मानवाला भाषेशिवाय जगता येवू शकत नाही. भाषा ही सर्वांची एक उपयोगी 'सामाजिक संस्था' ठरते. बोलीभाषा ही बोलली जाणारी भाषा ही जिवंत व खळाळती भाषा असते. तीच लोकभाषा असते. ह्या लोकभाषेवरच लोकजीवनाचा पिंड पोसला जातो. 'वऱ्हाडी भाषा' ही आद्य महाराष्ट्राची लोकभाषा ठरते. वऱ्हाडी भाषा ही प्राचीन काळापासून उदयाला आलेली दिसते. पूर्वी महाराष्ट्र म्हणजे विदर्भ होता त्यांची प्राचीन महाराष्ट्र भाषा ही वऱ्हाडी होती. अश्वघोषामधून ब्राह्मणी, पाली साहित्यातून बौद्धप्रवाह, राजेशाहींच्या पंखाखाली वाढलेला संस्कृत प्रवाह आणि सतत वाहत राहिलेला लोकसाहित्याचा प्रवाह ह्याच प्रवाहातून लोकभाषेत म्हणजे वऱ्हाडी भाषेतीलच होता.

वऱ्हाडी भाषेचे प्रदेशनिहाय विशेष:

भाषा ही मानवी समुहातील घटकाकडून एकमेकांना अनुभूतीत सहभागी होते. सामाजिक सहकार्य साधण्यासाठी अन्यान्य क्रियेने शिकून जतन केली जाते. वऱ्हाडी ही लोकभाषा आहे. ती लवचिकतेबरोबर

Copyright © | JET Network, All Rights Reserved

समृद्धही आहे. भाषा, स्पष्ट, रंगीन, वेगवेगळ्याा अर्थछटा व्यक्त करणारी, पारिभाषिक, जोरकस व रोचक असेल तर ती संपन्न भाषा असते. वऱ्हाडी भाषेत हे सर्वच गुण आहेत.

वऱ्हाडी भाषेचे काही उपप्रकार आहेत. त्यात भाषा, लोक आणि प्रदेश यांच्या अतुट संबंधामुळे हे प्रकार पडतात. तर काही ध्वनिपरिवर्तनाचे आनुवांशिक गुण उच्चार, आघात, हवामान, राजकीय व सामाजिक परिस्थिती, जे त्यांचा प्रभाव नवे स्वीकारण्याची वृत्ती ह्यामुळे मानवांच्या जीवनावर परिणाम होवून भाषा बदलत असते. प्रदेशाप्रदेशातील व्यक्तींच्या सवयीवर, बोलण्यावर, विचारावर प्रभाव पडत असतो. त्यामुळे त्या प्रदेशाची बोली वेगवेगळी निर्माण होते.

त्यामुळे वऱ्हाडी भाषेचे प्रदेशनिहाय प्रकार पडतात.

1) पूर्णाट्टीची वऱ्हाडी - उदा. 'ण'चा 'न' होतो = मानूस. शब्दांत 'इ' कराचा लोप होतो - उदा. धरित्री - धरतरी. रूपविचारात 'ले' हा चतुर्थीचा प्रत्यय लागतो. उदा. मला - मले.

2) सीमावर्ती वऱ्हाडी - ही यवतमाळ जिल्ह्याच्या दक्षिणेकडे आंध्रप्रदेशात आहे. यावर द्रविडी भाषेचा परिणाम आहे. या भागात कोमटी, वडार, तेलगू इ. बोली बोलल्या जातात.

3) मराठवाड्यातील वऱ्हाडी - मराठवाडा आणि विदर्भ हे दोन्ही प्रदेश आद्य वऱ्हाडी बोलीचे प्रदेश होते. पुढे हीच मराठवाड्याची मराठवाडी भाषा झाली. मराठवाड्याात संत ज्ञानेश्वर व एकनाथांनी विपुल ग्रंथसंपदा निर्माण केली.

4) मध्यप्रदेशालगतची वऱ्हाडी - बुलढाणा व अमरावती या जिल्ह्यांना लागून असलेला मध्यप्रदेश पूर्वी वऱ्हाड प्रांत मध्यप्रदेशाला जोडून होता. त्यामुळे हिंदी भाषेचा प्रभाव ह्या वऱ्हाडीवर आहे. अनेक फार्शी व अरबी शब्द हिंदीच्या माध्यमातून वऱ्हाडीत आले. वऱ्हाडीत करनं पडते, देनं पडते इ. क्रियारूपाची योजना हिंदीच्या संपर्कामुळे होऊ लागली.

5) खानदेशालगतची वऱ्हाडी - विदर्भातील बुलढाणा हा खानदेशालाच लागून आहे. बहिणाबाईंनी निसर्ग आणि लोकधारणा टिपत त्यांच्या काव्यांची भाषाच (खानदेशी वऱ्हाडी) आहे. खानदेशाची मूळ भाषा अहिराणी आहे. अहिराणीची प्रत्यय प्रक्रिया वेगळी आहे. षष्ठीच्या प्रत्यासाठी 'ना' चा वापर होतो.

6) वऱ्हाडी नागपुरी - नागपुरी भाषा हे वऱ्हाडीचे व्याकरण विशेष घेतलेली आहे. कारण 'ळ' चा वऱ्हाडीत 'र' होतो. इतर भाषेचे समृद्धत्व घेवून आपले वेगळेपण राखले आहे. उच्चार भेदात आद्य वो विकल्पाने येतो. विभक्ती प्रत्यय नागपूरीत व वऱ्हाडीत 'ला' प्रत्ययाचा मुख्य भेद आहे. वऱ्हाडी भाषा इतर अनेक भाषांच्या संपर्कात येऊनही तिने आपले स्वत्व कायम राखले आहे.

Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1 March 2025

Impact Factor: 7.665, UGC CARE I

वऱ्हाडीचे भाषाविशेष -

'वऱ्हाडी' ही भाषा अत्यंत प्राचीन असून मूळप्रवृत्ती जवळ असणारी एक समृद्ध भाषा आहे. तिच्या मध्ये स्वतःचा गोडवा, लवचिकता व लयबद्धता ही वैशिष्ट्यो आहे. तिच्यामध्ये काही शब्द विशेष आगळे आहेत. उदा. माय, वावर, सासरी इ. त्यातच वऱ्हाडी भाषाच प्रतिभासंपन्न सहित्यिकांनी तिचा वापर करून उजळून टाकले आहे. विशेषत्वाने लीळचरित्रात ह्या भाषेला अत्युच्च शिखरावर पोहचविले आहे. वऱ्हाडी भाषेत तिची कोवळीच तर आहेच. पण एक प्रकारची नादमधुरता व लय आहे. लोकसाहित्यातून वऱ्हाडी भाषेलाही वऱ्हाडी भाषेतून आलेले लोकगीतेही सौंदर्ययुक्त वाटतात. लोकगीताबरोबरच वऱ्हाडी भाषेत अनेक सारभूत अर्थ दडलेल्या म्हणी आढळतात. माणूस मनाने श्रीमंत असेल तर तशी शब्दांची व म्हणींची श्रीमंती वऱ्हाडी भाषेत आढळते. उदा. राज करणे - नांदणे या वाक्प्रचारासारख्याच वाङ्मयीन सौंदर्याने परिपूर्ण म्हणीही आढळतात. वऱ्हाडीत शब्दारंभी 'वा' हा उच्चार विकल्पाने येतो. उदा. वोरी, वऱ्हाडीत 'ळ' चा उच्चार 'य' असा होतो. उदा. फळ - फय. वऱ्हाडीत 'ण' कार आढळत नाही. त्याऐवजी 'न' काराचा प्रयोग होतो. विभक्ती प्रत्यय, क्रियाविशेषणे व क्रियारूपेही वऱ्हाडी भाषेची वेगळी आहे.

"भाषेच्या शब्दा-शब्दात इतिहास दडलेला असतो. म्हणूनच त्या त्या देशाच्या व प्रदेशाच्या भाषेत तेथील लोकांच्या आशा-आकांक्षेचे अनुभव समजुतीचे व चालीरितींचे प्रतिबिंब उमटलेले आढळते. विदर्भही याला अपवाद नाही. वैदर्भीय साहित्य महर्षीच्या लेखन तपश्चर्येचाच परिपाक म्हणजे विदर्भाचे वाङ्मयीन स्वत्व होय."5

भाषा सौंदर्य/बोलीभाषा -

साहित्याच्या वाङ्मयीन प्रवाहात 'बुढाई' ही कादंबरी तिच्या भाषेच्या विलक्षण सौंदर्यासाठी विशेष उठून दिसते. लेखिकेने वापरलेल्या शब्दांची लय, संवेदनशीलता व्यक्त करणारे वर्णन, तसेच संवादातील नैसर्गिकता यामुळे भाषा केवळ अभिव्यक्तीचे साधन न राहता वाचकाला कथेच्या गाभ्याशी जोडणारा पूल ठरते. प्रतिमा इंगोले यांच्या 'बुढाई' या कादंबरीतील भाषा ही ग्रामीण जीवनातील खऱ्या रंगांची आणि भावना-संवेदनांची प्रभावी अभिव्यक्ती आहे. या कादंबरीत वापरलेली भाषा ही पात्रांच्या रोजच्या जगण्याचा, त्याच दुःख, संघर्ष आणि आनंद यांचा एक जीवंत आरसा आहे. वापरलेली बोलीभाषा, प्रादेशिक लहेजा आणि सहज संवादशैली वाचकाला कथेच्या भावविश्वात पूर्णपणे सामावून घेते. विशेषतः उपमा, प्रतिमा आणि ग्रामीण शब्दांचे लाघवी आणि प्रभावी वापर कादंबरीच्या भाषेला एक विलक्षण सजीवता देतो, ज्यामुळे वाचक प्रत्येक प्रसंगाला अधिक जवळून अनुभवतो.

Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1 March 2025

JOURNAL OF EAST-WEST THOUGHT

Impact Factor: 7.665, UGC CARE I

एकूणच कलाकृतीला प्राप्त होणारे वेगळेपण म्हणजे रूप, भाषारचना, आकृतीबंध, संरचना अशा घटकांचे वेगळेपण साहित्य कृतीला शैलीमुळे प्राप्त होते. म्हणून "कोणत्याही कलाकृतीत आविष्कार द्रव्याची जी विशिष्ट रचना झालेली असते त्या विशिष्ट रचनेला शैली म्हणावे. शैलीचा संबंध साहित्यातील आविष्कारद्रव्य म्हणजे अनुभवांशी, विषयरूपाशी येतो असे आहे. शैली केवळ भाषा योजना नव्हे. कलावंताची कल्पनीय अनुभव घेण्याची पद्धती म्हणजे शैली होय. अशी शैलीची व्यापक भूमिका आहे. म्हणजे कलाकृतीला अस्तित्व, वेगळी ओळख शैलीमुळे प्राप्त होत असे मानले जाते. म्हणजेच एका लेखकाची, एका काळाची, एका प्रवाहाची स्वतंत्र शैली निर्माण होऊ शकते. बुढाई या कादंबरीत प्रतिमा, अलंकार, ग्रामीणता, देशीयता आणि नैसर्गिकता या घटकांचा वापर केल्याने कादंबरीत अधिकच जिवंतपणा आला आहे. कादंबरीच्या सुरूवातीच्या प्रकरणात नवजीवन नगराचे वर्णन तिचे भकास होवू पाहणाऱ्या रूपाचे वर्णन करताना लेखिकेने टिक्कर खेळण्याच्या घट आखण्याची प्रतिमा वापरली आहे. "काळ वावर हिरव्या भांगानं शोभावं, तिथं आता ते डिग्गरच्या घटासारखाचं दिसत होतं." असं नवजीवननगर आता कसे लयाला जाईल याचे चित्र वाचकापुढे उभे राहते. नवजीवन नगरात राहायला गेल्यावरही गोकर्णाला गावातील गोष्टींची सय येत होती. भूतकाळाचे डाग मन पटलावून फिके होत नव्हते. तेव्हा तिच्या आठवणीला जाग्या करतांना लेखिका प्रतिमा वापरते की, "किल्ली दिलेल्या बाहुलीगत गोकर्णा गाठोड्यासह जागीच थांबली." या प्रतिमावरून गोकर्णाच्या झालेल्या अवस्थेने वाचक स्तब्ध होतो. तसेच बुढ्याने गुलाबला बिडी ओढण्याच्या कारणावरून बेदम मार दिल्याने गुलाब घरून निघून जातो, त्याच्या बेपत्ता होण्याचे वर्णन लेखिका करतात की, 'भुईनं गिळल्यागत पाहता पाहता बेपत्ता झाला, तसं दोघांचही आभळ फाटलं." नवजीवन नगरला जाण्याचा विचार करतांना होणारी जीवाची घालमेल वर्णन करतांना लेखिका लिहितात, "एवढ्या घरादाराला सोडूनं, घर सोडून अंगण पारखं करण्याचा विचार तसा वेडेपणाचा होता." कुटुंबाच्या मनातील कालवाकालव प्रतिमेद्वार दर्शविली आहे. नापसंत मुलाशी संसार थाटल्यावर त्याच्या सोबतच्या संसारात सत्तुची झालेली दयनीय अवस्था रेखाटतांना लेखिका लिहतात, "हरवलेल्या वासरानं घरी आल्यावर हाप-हाप करावं तशी सत्तू उसमारे टाकत होती." या वाक्यातील प्रतिमेवरून सत्तूची संसारात चाललेल्या फरफटीचे चित्र वाचकांसमोर तरळते व सत्तूसोबत वाचकही दुःखी होवू लागतो. कुबड्या, बुढा, गोकर्णाचा जावई सत्तुचा नवरा याच्या माणसात असलेल्या वासनारूपी राक्षसाचे रूप वर्णन करतांना हैवानाची प्रतिमा लेखिका रेखाटते. माणसातील राक्षसी रूप व अशा राक्षसीवृत्तीने स्त्रीची होणारी कुचंबणा दिसून येते. "जंगलातल्या जनावरानं दिवसा गुहेत मस्त तन्नावून द्यावं आन् राती भक्षावर तुटून पडावं तसा तो रात्रभर सत्तूच्या देहावर तुटून पडत होता." या प्रतिमेवरून

Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1 March 2025

Impact Factor: 7.665, UGC CARE I

स्त्रीवर तिच्याच पतीने अविचाराने अत्याचार करावे अशा चित्राने मन सुन्न होवून जाते. वासनेच्या बिभत्सपणा दिसून येतो. अशा अनेक प्रतिमांचा वापर करून लेखिकेने लेखनाची सिद्धहस्तता सिद्ध केली आहे.

बुढाईत प्रतिमांप्रमाणे उपमा, व्यतिरेक, चेतनगुणोक्ती, अलंकाराचा वापरही लेखिका सहजपणे करतात. 'निस्तेज व कळाहीन ह्या जमिनीच्याही नशिबी आता फुलणं नव्हतंच' जमिनीचे निस्तेज होण्याच्या प्रक्रियेने खेड्यातील शहरीकरणाची कल्पना वाचकाला येते. तसेच सत्तूची अगतिकता वर्णन करतांना तिच्या नाजुकपणाचे व सुरक्षेच्या आवश्यकतेचेही वर्णन उपमेत दिसते. "आपल्या लेकीनं वयात येण्यापूर्वीच गोगलगायी सारखं अंग चोरावं, असंही तिला वाटू लागलं होतं." तसेच "गोकर्णा मनातल्या मनात तडफडू लागली. सापासारख्या लहरा देऊ लागली." व "ह्या जमिनीसारखीच गोकर्णाच्या मनाची स्थिती झाली होती. ती आतल्याआत भेगाळली होती.", "पुढे जायची उमेदच पुरानं मातीची भिंत आणावी तशी खचून गेली होती.इ.उपमेतून गोकर्णाची चेपलेली अवस्था दिसून येते. व्यतिरेकाचा वापर करून सत्तूच्या मनाची अवस्था वर्णन केली आहे. "चारी संध्याकाळ एक झाली होती." या वाक्यावरून सत्तूच्या नाराज मनाची व नवऱ्यामुलाच्या त्रासाने घाईस आलेल्या गोकर्णाचे मन समजून येते. निराशामय वातावरण लेखिका वर्णन करते. गोकर्णा, बुढा व गोंडाजीच्या म्हणणाऱ्यावरून कुबड्या सुधरेल अशी खोटी आशा ठेवून कुबड्याला नवजीवन नगरात राहायला बोलावतात तरी त्याची मूळ वृत्ती जात तर नाही उलट आणखी मुजोरपणाचे वागणे वाढते. तेव्हा सत्तूच्या अवस्थेचे वर्णन करतांना लेखिका, चेतनगुणोक्ती अलंकाराचा वापर करतात. "नवजीवन नगरातील काळी जमीन ही तर असंच सोसत होती. जणू सत्तू तिचंच सानुलं, सजीव रूप होती." निसर्गातील काळी नवजीवन नगराच्या जमिनीवर सत्तूच्या कोवळया मनाचा आरोप केलेला आहे.

'बुढाई' ही वऱ्हाडी भाषेतील कादंबरी त्यामुळे वऱ्हाडी बोलीच्या संवादामुळे, ग्रामीणतेमुळे एक वेगळा गोडवा अनुभवास येतो. "सकायपासून धाळंत जाईन, भाऊसायेब" "बरं! चालतं का माया गावल्ले?", "काहाले जी? बरं आपलं गाव आन आपलं घर." गोकर्णाचे भोळं मन संवादावरून दिसून येते. तर गोकर्णाविषयी नाथाच्या गोपीची काळजी पुढील संवादावरून दिसून येते. "तू असं कावून नायी करत व गोकर्णे? एखाद्या देवापाशी जावून पायनं! आली त्याले कीव तं येवून जाईन!" तसेच दैनंदिन जीवनाची गरीबांना किती काळजी घ्यावी लागते हे समजते. "बाप्पा! लयच टाईम केला तुमी यियाले? पन् भाऊसाहेब! आमाले पियाले पानी?" त्याच बरोबर कुबड्याला पोरगी देवून सत्तूचे वन झाले हे लक्षात आल्यावर तिची वास्तपूस्त करताना गोकर्णाचे संवाद लेकीवरची माया व काळजी दर्शवते. "का व जावईबा जात असतीन नायी कामाले?" "मले कायी पुसू नको. सांगालं ना येकडाव!" "अवं, मायमकाजोळयी कोनी सांगत नसते," इ. संवादावरून लेकीच्या अवस्थेने गांगारलेली जिद्दी गोकर्णा वाचकाला दिसते. बुढाईचा गाभा ग्रामीणता

Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1 March 2025
Impact Factor: 7.665, UGC CARE I

असल्याने ग्रामीण जीवनाचे वास्तव वर्णन कादंबरीतून दिसून येते. "पांढऱ्या जमिनीला गाव म्हणत. ह्या पांढऱ्या जमिनीवरच माणसं वसायची. ह्या पांढऱ्या मातीवर पांढऱ्या मातीचीच घरं बांधली जायची. ती पिढ्यान पिढ्या. टिकायची. ही घरं सारवण्यासाठीही पांढरीच माती वापरली जायची. पण तरी ही घर मजबूत असायची. नातवंड, पतवंड, आरामात पाहायची. आपल्या ओलात्यात माणसांना बांधून ठेवायची." असे गावातील घराची वास्तवता व त्यातील आपलेपण समजते. असेच आपलेपणाची सर्वांना सामावून घेण्याची ग्रामीण पद्धत, ज्यात दुजाभाव नाही हे या कथनावरून दिसते. त्यांच्या गावात असं चालतच होतं. माणसं नवीन काही केलं की, एकमेकांना देत होती. उलट दुसऱ्याला देता यावं म्हणून, मुद्दाम काहीतरी करत होती. "बस्तरवारी त्यांच्या गावचा बाजार राहायचा. त्यादिवशी सकाळी शाळा राहायची. त्याच दिवशी नेमका त्यांना खाऊ मिळायचा. खेड्याात इतर दिवशी गोळयाा बिस्कीटांशिवाय काही मिळायचं नाही. त्यामुळे लेकरं बाजाराची वाट बघायची. मग ती पैसेवाल्यांची असो की गबिबांची! फार तर खाऊत फरक पडायचा. पेढे, साखरेची पेरकुडं, बत्तासे असा महाग खाऊ पैसेवाल्यांच्या लेकरांना मिळायचा तर चिरंजीचे दाणे, फुटाणे कधी कधी शेवचिवडा असा खाऊ मधल्या माणसांच्या लेकरांना मिळायचा." यावरून ग्रामीण जीवनाची पूर्ण कल्पना लेखिका देतात. ग्रामीण जीवनाचे वळण वर्णन करतांना लेखिका लिहितात की, सगळयांनाचा भुका लागल्या होत्या, पण आम्ही जेवून घेतो असं म्हणणही बरं दिसणार नाही, असं एकंदर जुनंच गावचं वळण होतं. कादंबरीच्या निमित्ताने ही ग्रामीणता जोपासलेले दिसते. तसेच सत्तू सासरच्या जाचाने कंटाळून थकल्या अवस्थेत घरी येते तेव्हा गोकर्णाशिवाय तिला विचारणारे कोणी नाही याची खंत व्यक्त करतांना ग्रामीण जीवनाचे महत्त्व अधोरेखित करताना गोकर्णा म्हणजे, "आपण आता इथं बसावं की सत्तूचं बघावं? नगरात एकच बि-हाड होतं व त्यांच्याशीही बोलचाल बंद झाली होती. त्यामुळे गोकर्णाला हुरहुऱ्यासारखं वाटत होतं. गावात आणि शहरात हाच फरक होता. गावातली लेकबाळ सगळयां सगळयांचीच असते आणि बायामाणसांनी ती झाकली जाते" ग्रामीण संस्कृतीचा व आपुलकीचा अभाव शहरात असतो हेही लेखिका प्रकर्षाने दाखवून देतात.

बुढाई कादंबरीत ग्रामीणतेसोबत देशीयता सुद्धा पावलोपावली लेखिकेने वर्णन केली आहे. नवजीवन नगरात चालण्याचा गोकर्णा हट्ट करते आहे असे दिसल्यावर बुढा आपल्या गावाविषयीची ओढ दर्शवित म्हणतो की, "अवं! तथी त्याईचा मालटाल रायीन. मंग कोन जोखम उचलावं? मी पायलो काळीमुळीचा! येवाव कोनअन देवाव चारपाच लाथा. आननेवाव माल उचलून! काय करतं मगं! जिवाले फाशी लावत काय? तेच्यापरस आपलं गाव पुरलं. कोरभर कमी खावं पन आपला उंबोठा सोळू नायी." ग्रामीण भागातील देशीयता दर्शवितांना विचारसरणीची झलक गोकर्णाच्या मनोगतातून दिसते की, "भुकेल्या माणसाला दोन घास खाऊ

Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1 March 2025

JOURNAL OF EAST-WEST THOUGHT

Impact Factor: 7.665, UGC CARE I

घातले तर पापात जात नाहीत. कोणाची तहानभूक जाणणं, तसं माणुसकीला धरूनच आहे. गरीब श्रीमंती शिवाय एखाद्या जीवाचा माणूस म्हणून विचार करणे हे फक्त ग्रामीण भागातच होवू शकते. आर्थिक परिस्थिती व श्रीमंती महत्त्वाची नाही. पापपुण्याचा विचार करीत कुणाची गरज भागावणं हे नैतिकतेला धरूनच आहे.

लेखिकेचे संपूर्ण वास्तवच व-हाडातील असल्याने व कादंबरीची बोली वऱ्हाडीच असल्याने जणु भाषेतील अमृतच चाखायला मिळते. लेखिकेने गिलावा देतानांच भाषेबद्दल खुलासा केला आहे की बुढाईतील संवाद वऱ्हाडी बोलीत आहेत. 'वऱ्हाडी' मराठी भाषेचे तान्हे रूपडे होय! वऱ्हाडी भाषेमध्ये 'ण' कार नाही त्याऐवजी 'न' वापरला आहे. उदा. बाण-बान किंवा पाणी-पानी. तसेच 'ळ' ऐवजी 'य' येतो. उदा. शाळा - साया किंवा फळ - फय तसेच 'ड' ऐवजी 'ळ' येतो. उदा. झाड - झाळ, किंवा दगड - दगळ तसेच ला विभक्ती प्रत्ययाऐवजी ले वापरतात. सामान्य रूपाच्या ह्या प्रत्ययाने अनेकवचने तयार केली जातात. स्त्रिया प्रथमपुरूषी बोलतात, तसेच चालू वर्तमानकाळ वापरत आहे. त्यामुळे देजो, करजो अशी रूपे आढळतात. कादंबरीतील भाषेचे रूप आकळावे म्हणून लेखिकेने तीसही प्रकरणावरील शब्दार्थ दिलेला आहे. त्यामुळे नविन शब्दांचे अर्थ वाचकाला कळतो सोबत शब्द संग्रह होवून भाषेचा गोडवा कळतो. तीस प्रकरणातील 461 शब्दांचे अर्थ देवून एक लघूकोश वाचकांस दिला आहे. त्यात उफराटा = उलटा, वसान = ओसाड, जेठानी = थोरली जाऊ, कदर = काळजी, इतवार = रविवार, लय = खूप असे शब्द वाचकाला समजू शकतात. परंतू उरवाल = आयुष्य, हातोई = सुलग्न, करोळा = मुगाचे सांडगे, फुईबहीण = आतेबहीण, कानसली = उदास इ. शब्दांचे अर्थ माहित असल्याशिवाय वाक्याचा अर्थ स्पष्ट होत नाही.

वऱ्हाडी बोलीचे सौंदर्य म्हणजे बोलीतील म्हणी व वाक्प्रचार होय. कादंबरीत पात्रांच्या मुखी सहजच म्हणी व वाक्प्रचारांचा वापर दिसून येते. त्यामुळे कादंबरीची वाचनाची लय, उत्कंठा शेवटपर्यंत टिकून राहते.

कादंबरीतील बोलीतील काही वऱ्हाडी म्हणी -

(1) सरड्याची धाव खोटी आन् पैसे वाल्याला हाव मोठी! (2) पैसा कसा सोडू जिवाला येते रडू! (3) आहाणी कहाणी काचाची अन् राजगिऱ्याच्या भाताची! (4) ढवळ्या शेजारी पवळ्या बांधला, वाण नाही पण गुण लागला! (5) हळ्या बसाशी आन् डांग मोळाशी (6) ज्याचं जयते त्यालेच कयते. (7) लाळाची लाळकी अन फुलाची फुळकी? (8) आपल्याघरची लात कामाची, पन लोकाचां भात नायी कामाचा. (9) ओवायनी काचकोराची अन् ठसन पाटलाची! (10) जोळ नाही ढेला अन् आपटू-आपटू मेला (11) खेड्याची वस्ती आन दाय खाय निस्ती (12) गरीब देवा लाता मार खनतळ देवा नमस्कार (13) पैसा फेक अन् तमाशा देख (14) आगीतून निघून फुटाट्यात पडणे (15) वयरी ना चिते ते मन चितते. (16) दिसते तसं नसते. (17) करू गेलं काय नि उलटे झाले पाय. (18) घार फिरते आकाशी चित्त तिचे पिलापाशी. (19) अळली गाय नि काटे खाय

Copyright © | JET Network, All Rights Reserved

(20) संपत्तीची करते धरसार अन् नादारीची करते इचार. (21) कोनाचेई एकाचे एक्कीस आन पाचाचे पच्चीस होवो. (22) ज्योल नाही कोनी तो पडला वनी तस रायतो आमी. (23) एक कोबडं अन् सदा लंगडं (24) लेकरायची माय तिचे पाखराचे पाय (25) सांगोपोंगा, एक वावर तीन दिवस सोंगा (26) जित्याची खोळ तं मेल्याशिवी जातच नाही! (27) ढेला न दमळी आन् फुकाची लोमळी 28) हेल्यावाल्याचा हेवा खेर पुंज्यान पवटा नेला. (29) पुनीव बाई कुकळे, जोंगा मागते चहुकळे. (30) शेळी जाते जिवानिशी, खाणारा म्हणतो वातड. (31) ज्याची कावशी तेच उस्ताशी. (32) सारा दिवस पाखडलं अन् काहीच नाही सापडलं. (33) करिन्याचा कांद अन् फोडनी दिऊन रांधा. (34) आकाबाई मांगं व दिड पैसा संग. (35) ये रे माझ्या मागल्या अन् हाक न जाय बोंबल्या. (36) वाऱ्यावर वरात अन् भितीवर सराद. (नियोजनरहित जीवन जगणे) (37) मानसाचं देनं पुरे ना अन देवाचं देनं सरेना. (38) सांग्याची मात अन् धळयाची एकच वात! (39) 'जोळ नायी दमडी अन् बदावली कोंबडी' (40) 'मले पा अन फुलं वाहा' (41) करू गेलो काय अन् उलटे झाले पाय. (42) एक टिकली हाताला डिकली. (43) डोंगर जळते जन पाहते, मन जळते कोण पाहते? (44) ढोरक्यानं ढोरं टाकले तं घरधनी थोळाच टाकत असते. (45) अराबा अन जीवाचा खराबा (46) तरूणाईचे पडले मेट, म्हाताऱ्याईले जोर मोठं.

जी पिढीतील बदलांवर, तरूण पिढीच्या दुर्बलतेवर किंवा त्यांच्या मर्यादांवर आणि वृद्ध पिढीच्या अनुभवांवर उपरोधाने भाष्य करते.

तरूण पिढीच्या कडून अपेक्षित ऊर्जा, धाडस किंवा काम करण्याची क्षमता कमी झाली आहे किंवा ते अपयशी ठरत आहेत. याचा अर्थ असा की तरूणाई ही सध्याच्या आव्हानांना सामोरे जाण्यात कमी पडत आहे. मोठं-वृद्ध पिढीकडे अनुभव, ज्ञान आणि काम करण्याची तयारी अजूनही शाबूत आहे. त्यामुळे त्यांच्या अनुभवाचा उपयोग मोठा आहे, जरी शारीरिक ताकद कमी असली तरी अनुभवाला ताकदीपेक्षा अधिक महत्त्व असते. (47) मानानं न खाय रोटी अन् निजल्या उखय चाटी. (48) शायन्याची माती अन् बांदराची खुशामती. (49) अशी मायी राधा अन् जवाई गधा. (50) घरादाराची येपायी अन् ढेप्या भरतार कपायी. (51) वळलं तर सूत नाही तर भूत. (52) दुभत्या म्हशीच्या लाथा गोड आणि चिपडी बायको पुतानं गोड. (53) घटा कटा पान्याचा वटा.

असा अर्थ सूचित करते की, जिथे एखाद्या गोष्टीचे अस्तित्व असले तरी तिचा उपयोग किंवा परिणाम होत नाही.

Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1 March 2025
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, UGC CARE I

वऱ्हाडी वाक्प्रचार

(1) आवळा देवून कोवळा काढणे - छोटी गोष्ट देऊन मोठी गोष्ट उकळणे (2) गंज होणे - स्तब्ध होणे (3) वाऱ्यावर भारे बांधणे - अकल्पित, असंभनिय गोष्टींचा विचार करणे (4) होम जिंकणे - हवं ते मिळविणे (5) झंबुक देणे - खोड जिरवणे (6) कल्ला करणे - गोंधळ करणे (7) सगुन पाहणे - शुभ-अशुभ ठरवणे (8) भिन होणे - त्रासून जाणे (9) टिरींग टिरींग करणे - कुरकुर करणे (10) नाटीवर उभे राहणे - प्रसंगाला उभे ठाकणे (11) माथ असने - अवलंबून असणे (12) मनातली खुळसा निघने - मनाला दिलासा मिळणे (13) कानाडायनी करणे - कानाडोळा करणे (14) खस खाने - खूप रागावणे (15) खंदू खंदू पुसने - खोदू खोदू विचारणे (16) काऊलबाऊल होणे - थकणे (17) आपखायरी करणे - स्वतःला त्रास देणे (18) वरण्या उभ्या राहणे - योग येणे (19) चुटका लागणे - चुटपूट लागणे (20) भगर भगर होने - जीव तुटणे (21) नांदा लावणे - पुन्हा पुन्हा म्हणणे (22) आंग टाकणे - डुलकी देणे (23) सरमसांड होणे - लाजेने अर्धमेले होणे (24) झाडनी देणे - शहारे येणे (25) खुशामत करने - लाडी गोडी लावणे. (26) नवा देने - झोकांड्या देणे (27) हुली येणे - ओकारी येणे (28) तलखी होणे - काहली होणे (29) तिट्टीचे आंडे खाणे - अजिबात न बोलणे (30) अखरी येने - अडून बसणे (31) काचोनी पडने - तडतड होणे (32) कावशी येने - ओकारी येणे (33) पीट घेने - मागे लागणे (34) ठी असने - ठेव असणे (35) उटानं कुट खाने - नुकसान न होणे (36) आगीसडवान्या पडणे - आताताादीपणा करणे (37) सुना डाव साधणे - संधी साधणे (38) कलला करने - ओरडणे (39) टाप नसणे - हिंमत नसणे (40) झांज येणे - चक्कर येणे (41) हाय खाने - हतबल होणे (42) काच लागने - असह्य होणे (43) डोल ठंडे होने - कार्यपूर्ती होणे (44) इरावून बसणे - नाराज होणे (45) गचक खाणे - धास्ती येणे (46) सुतीपाती लागने - तालावर येणे (47) सार करणे - पाठवणी करणे (48) मेंट पडणे - चालणे असह्य होणे (49) इिवा बसणे - भयचकीत होणे (50) झेंडू दाटून येणे - भोंड येणे, चक्कर येणे (51) पासले पडणे - झोपणे (52) हसले गुंग होणे - डोके बधीर होणे (53) मीस करने - बहाने करणे 54) खकाना करणे - आकांततांडव करणे (55) खोडा पडणे - अडथळा येणे (56) झाकट पडणे - अंधार पडणे (57) खाडा पडने - कमी पडणे (58) झट घेणे - आळ घेणे (59) लोंधे तोडने - लचक/मांसाचे गोळे तोडणे (60) सुतावर येणे - सरळ होणे (61) लास पडने - जीव घेणे (62) उरयभाज करने - आहारात भाजणे (63) लाही लोज करने - जीवाची पर्वा न करणे (64) चित पाहने - मजा पाहणे.

समारोप

एकदंरीत वऱ्हाडी भाषा फार श्रीमंत व प्राचीन भाषा आहे. ती लवचिक आणि लयबद्ध आहे. त्यामुळे ती दुसऱ्यापर्यंत थेट पोहोचवते. संत गाडगेमहाराज, संत तुकडोजी महाराज यांनी वऱ्हाडी भाषेचा वापर

Copyright © | JET Network, All Rights Reserved

मुक्तपणे व संपूर्ण महाराष्ट्रात केला. वऱ्हाडी भाषा ही मराठी भाषेची मुळ भाषा आहे. म्हणजेच ती मराठीची जन्मदाती भाषा आहे. वऱ्हाडी बोली ही खरी मुळ लोकभाषा आहे. 'बुढाई'त लेखिकेने 64 वाक्प्रचार, 53 म्हणी, अलंकार, प्रतिमा, देशी शब्द वापरून कादंबरी उच्च कोटीला नेली आहे.

निष्कर्ष

1. वऱ्हाडी ग्रामीण संस्कृती व भाषा अभ्यासता आली.
2. वऱ्हाडी शब्दसंपदा, वाक्प्रचार व म्हणींचा लेखी दस्ताऐवज कादंबरीरूपात जतन करता येतो.
3. वैदर्भीय वऱ्हाडी बोली भाषेचे जतन करता येते.
4. ग्रामीण बोली व नागरी बोली यातील फरक अभ्यासता आला.

संदर्भ सूची -

1. डॉ. सुलभा हेर्लेकर, डॉ. प्रज्ञा आपटे, आगळे अनुभव विश्व, (डॉ. प्रतिमा इंगोले), दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्र.आ. 2006, पृ.क्र. 93
2. डॉ. आनंद यादव, ग्रामीण साहित्य: स्वरूप आणि समस्या, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, तृतीयावृत्ती, 1993, पृ. 80, 81
3. मो. रा. वाळंबे, सुगम मराठी व्याकरण व लेखन, 54 वी सुधारित आवृत्ती, 2019 पृ.क्र 1
4. डॉ. मोहन शेळके, आनंद बंडारे, भाषाशास्त्र आणि व्याकरण, पृ.क्र. 8
5. जोशी चंद्रहास, विदर्भदेशीचे प्राचीन वैभव, अमृत. जुलै 1989]
6. डॉ. प्रतिमा इंगोले 'बुढाई' देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा. लि., पहिली आवृत्ती 1999
7. कैलास तात्येराव गवई, "प्रतिमा इंगोले यांचे साहित्य एक चिकित्सक अभ्यास", स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा, विद्यापीठ

Copyright © | JET Network, All Rights Reserved